जन ५३७-१२००

# परिपत्रक

क्र.एमओएम/६८८३ दि. १९.३.२००२

विषय : महाराष्ट्र माहितीचा अधिकार २०००

संदर्भ : महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग क्र.एसटी/११०१/प्रक/२३३/२००१/नवि ३/आस्था, दिनांक २४.८.२००१.

महाराष्ट्र माहितीचा अधिनियम, २००० हा अधिनियम दि.११. डिसेंबर २००० पासून राज्यात अंमलात आलेला आहे.

सदर अधिनियमांची प्रत आपल्या माहितीकरिता सोबत जोडली आहे.

महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००० (२००० चा महा ३८) च्या कलम २, खंड (१) व कलम ५ खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र शासन याद्वारे या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी प्रत्येक महानगरपालिकेने 'सक्षम प्राधिकारी' व 'अपीलीय अधिकारी' घोषित करण्याचे अधिसूचित केले आहे. त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेसाठी संबंधित माहिती मागणीनुसार जनतेला उपलब्ध करुन देण्यासाठी खालील अधिका-यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| (१) संबंधित संचालक/उप आयुक्त/सह आयुक्त | सक्षम प्राधिकारी |
| (२) अतिरिक्त आयुक्त/महानगरपालिका आयुक्त | अपिलीय अधिकारी |

## अधिसूचना

१. संक्षिप्त नाव - या नियमांना महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम २००० असे म्हणावे.

२. व्याख्या - (१) या नियमामध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

(अ) 'अधिनियम' म्हणजे महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००० (२००० चा महाराष्ट्र ३८),

(ब) 'अपील प्राधिकरण' म्हणजे या अधिनियमाच्या कलम ५ च्या पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेल्या आदेशाद्वारे राज्यशासनाने अधिसूचित केलेले कोणतेही प्राधिकरण.

(क) 'विहित' म्हणजे या नियमांन्वये विहित केलेले

(२) या नियमांमध्ये वापरण्यात आलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द आणि शब्दप्रयोग यांना अधिनियमात अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच त्यांचे अर्थ असतील.

३. माहिती मिळविण्याची कार्यपद्धती -

(१) या अधिनियमाच्या तरतुदींन्वये तरतूद केल्यानुसार माहिती मिळविण्याची इच्छा असलेली कोणतीही व्यक्ती १० रुपये किंमतीचा न्यायालय फी मुद्रांक चिकटवून साध्या कागदावर जोडपत्र 'अ' मध्ये दिलेल्या स्वरुपात संबंधीत सक्षम प्राधिका-याकडे अर्ज करील.

(२) पोटनियम (१) अन्वये अर्ज मिळाल्यावर सक्षम प्राधिकारी कलम ३ च्या पोटकलम (२) याच्या तरतुदींच्या अधीन राहून, आवश्यक माहिती मागविल व संकलीत करील आणि पोट-नियम (३) नुसार अर्जदाराने भरणे आवश्यक असलेली फी आकारील.

(३) सक्षम प्राधिका-याने आवश्यक माहितीचे संकलन केल्यानंतर, तो अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत या नियमांना जोडलेल्या अनुसूचीनुसार अर्जदारास, सक्षम प्राधिका-याकडून त्याला अशी माहिती पुरविण्याकरिता देय असलेल्या फीची रक्कम आणि ज्या तारखेस त्याने भरणा करावयाचा असेल व माहिती गोळा करावयाची असेल ती तारीख त्यास कळविण्यासाठी नमुना 'ब' मध्ये सूचना पाठवील.

जोडपत्र -२ -२-

(४) अर्जदार, सक्षम प्राधिका-याने कळविल्याप्रमाणे आवश्यक फीची रक्कम एकतर धनादेश (मनीऑर्डरने) किंवा संबंधित सक्षम प्राधिका-यांच्या कार्यालयामध्ये रोख रक्कम भरील किंवा शासकीय तिजोरीत भरणा करील.

(५) फीची रक्कम मिळाल्यावर किंवा चलनाची प्रत प्राप्त झाल्यावर अर्जदाराला, सक्षम प्राधिका-याकडून जातीने किंवा टपालाद्वारे, माहिती तात्काळ पुरविण्यात येईल.

(६) जर, सक्षम प्राधिका-याचे असे मत असेल की, या अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (२) अनुसार, मागविण्यात आलेली माहिती पुरविणे अनुज्ञेय नाही तर, तो अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, अर्जदारास त्याप्रमाणे कारणासह कळवील.

४. अपील प्राधिकरणाकडे अपील करण्याची कार्यपध्दती -

(१) नियम ३ च्या पोट-नियम (६) अन्वये, सक्षम प्राधिका-याच्या आदेशाद्वारे माहिती पुरविण्यास फेटाळण्यात आल्यामुळे पीडीत झालेली कोणतीही व्यक्ती, सक्षम प्राधिका-याच्या आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत, जोडपत्र 'क' मध्ये दिलेल्या स्वरुपात वीस रुपयांचा न्यायालय फी मुद्रांक चिकटवून त्या आदेशाची एक प्रत जोडून, अपील दाखल करु शकेल.

परंतु, ज्यास विहित कालावधीत माहिती मिळाली नसेल असा अर्जदार नियम ३ च्या पोट-नियम (६) अन्वये माहिती पुरविण्यास मिळालेल्या नकाराप्रमाणे माहिती पुरविण्यास अशी कसूर झाली असल्याचे समजू शकेल आणि अशा कसुरीबद्दल किंवा या नियमांच्या तरतुदींचे पालन न करण्याबद्दल अपील प्राधिकरणाकडे अपील करु शकेल.

(२) (एक) अपील प्राधिकरणासमोरील कार्यपध्दतीमध्ये, अपीलकारास, लेखी अभिवेदन करण्याची संधी देण्यात येईल.

(दोन) अपील प्राधिकरणाचा प्रत्येक आदेश, संबंधीत अपीलकारास, आणि ज्याच्या आदेशाविरुध्द अपील दाखल करण्यात आले होते अशा सक्षम प्राधिका-यालादेखील कळविण्यात येईल किंवा अपील प्राधिकरणाचा आदेश अंतिम असेल.

यास्तव, सर्व खाते प्रमुख/सहायक म.न.पा.आयुक्त यांनी अधिसूचनेत दिलेल्या आदेशाची काटेकोरपणे कार्यवाही करण्याकरीता सदर परिपत्रक सर्व संबंधित अधिका-यांकडून नोंद करुन घ्यावे असे याद्वारे कळविण्यात येत आहे. तसेच खाते प्रमुखांनी ज्या बाबींची माहिती देऊ शकत नाहीत अशा बाबी निश्चित कराव्यात. त्याचप्रमाणे ज्या बाबींची माहिती देणे शक्य आहे ती देण्यापूर्वी सोबत जोडलेल्या अनुसूचीत नमूद केल्यानुसार प्रथम शुल्क निश्चित करावे व विहित शुल्क स्विकारल्यानंतर सदर माहिती देण्यात यावी.

| | | | |
|---|---|---|---|
| सही/-(१५.२.०२) | सही/-(१८.२.०२) | सही/-(१९.२.०२) | सही/- |
| (श.शं.मझडदब्कर) | (श.रं.डांगे) | (अजितकुमार जैन) | (करुण श्रीवास्तव) |
| प्रमुख कर्मचारी अधिकारी | सह आयुक्त (सा.प्र.) | अतिरिक्त आयुक्त (शहर) | म.न.पा.आयुक्त |

महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय
सामान्य प्रशासन विभाग
क्र.एमपीएम/६८८३
दि. १९.२.२००२

सापवि/ १४
२००१-२००२

प्रत------------------------------------------- यांना माहितीसाठी व त्या कार्यवाहीसाठी रवाना.

प्रमुख कर्मचारी अधिकारी आजमारित